क्रमांक:- अल्पसंख्यांक / १२-१३ / २१-ई
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
दिनांक :- ०१/०८/२०१२.

प्रति,

१.) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
महाराष्ट्र राज्य.

२.) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक )
जिल्हा परिषद, सर्व.

३.) शिक्षण निरीक्षक ( बृहन्मुंबई )
पश्चिम / उत्तर / दक्षिण.

४.) शिक्षण प्रमुख म. न. पा.

विषय :- अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेची सन २०१२-१३ अंमलबजावणी करण्याबाबत सूचना.

संदर्भ :- १.) शासन अ.शा. पत्र क्रमांक पपंका-२००९/(८९/०९) असंक दिनांक ३० जून २००९
२.) शासन निर्णय क्रमांक पपंका २००७ (२७०/०७) दिनांक २३ जूलै २००८.
३.) शासन पत्र क्र. पंपंका/२०११/(४७/११)/ असंक दिनांक २० जूलै २०१२.

अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी मा. प्रधानमंत्री यांनी १५ कलमी कार्यक्रमानूसार अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. केंद्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द व पारशी या समाजातील विद्यार्थ्यांचा समावेश होतो. सदर योजना कालबध्द असून केंद्र शासनाने दिलेल्या सर्व सूचनाची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. सदर शिष्यवृत्ती इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी या अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लागू करण्यात आली आहे. या संबंधी खालील सूचनाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१.) उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचे आहेत.

२.) अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सन २०१२-१३ साठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी पुढील कालबध्द वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | विषय | दिनांक |
|---|---|---|
| I) | **सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) यांची व्हीडीओ कॉन्फरन्सिगव्दारे चर्चा.** | ०२/०८/२०१२ |
| II) | **सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) शिक्षण प्रमुख ( म.न.पा.) व प्रशासन अधिकारी यांची बैठक घेणे व योजनेची अंमलबजावणीबाबत माहिती देणे.** | ०३/०८/२०१२ |
| III) | **शिक्षणाधिकारी प्राथमिक / माध्यमिक व निरंतर यांनी गटशिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी ( न.पा.) यांची बैठक घेणे.** | ०४/०८/२०१२ |
| IV) | **गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख यांची बैठक घेणे.** | ०६/०८/२०१२ |

३.) सदरचे अर्ज मुख्याध्यापकांनी www.escholarship.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरुन भरुन त्याची एक प्रिंट घ्यावी सदरची प्रिंट तपासून प्रमाणित करुन गटशिक्षणाधिकारी यांचेकडे जमा करावी.

४.) गट शिक्षणाधिाकारी यांनी सदरचे प्राप्त अर्ज शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) / शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई ) यांचेकडे जमा करावेत.

५.) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) / शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई ) यांनी ऑनलाईन भरलेली माहिती व प्रमाणित करुन सादर केलेली प्रत याची तपासणी करुन शिक्षण उपसंचालक यांचेकडे माहिती सादर करावी.

६) विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर माहिती तपासून शिक्षण संचालक यांना फक्त ऑनलाईन सादर करावी. प्रमाणित केलेल्या सर्व प्रती जिल्हयांना पाठवून जिल्हा स्तरावर सर्व अर्जाच्या प्रती जतन करुन ठेवाव्यात.

७.) विद्यार्थ्यांने संपूर्ण अर्ज पूर्णपणे भरलेला आहे किंवा नाही हे पहाण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाची राहील. जिल्हा परिषद / नगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा अर्ज परिपूर्ण भरुन घेण्याची जबाबदारी शिक्षण / केंद्र प्रमुख याची राहील.

८.) विद्यार्थ्याचे अर्जात भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री मुख्याध्यापक / केंद्र प्रमुख यांनी करावी आणि अर्जात नमूद केलेल्या दोनही ठिकाणी स्वाक्षरी करावी. अर्जातील माहिती चुकीची आढळल्यस संबंधित मुख्याध्यापक जबाबदार राहतील आणि अर्ज नाकारला जाईल. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९) सन २००९-१० च्या शासन परिपत्रक दिनांक १३/०८/२००९ नुसार सदर योजना शिक्षण संचालनालय (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) यांचेकडे वर्ग करण्यात आलेली आहे. तथापि अद्याप सदर योजना शिक्षण संचालनालय ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) यांचेकडेच असल्याने जिल्हास्तरावर सदर योजना राबविण्याची संपूर्ण जबाबदारी शिक्षणाधिकारी ( माध्यमिक )/

शिक्षण निरीक्षक यांची राहील. शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) यांचेशी समन्वयाने काम पूर्ण करावयाचे आहे. याबाबतीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संपूर्ण सनियंत्रण करावे.

१०.) सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांनी आपल्या कार्यालयातील एका जाबाबदार उपशिक्षणाधिकाऱ्याची नियुक्त करावी आणि त्यांची नावे तात्काळ कळविण्यात यावीत.

११.) या योजनेचा सन २०१२-१३ चा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावयाची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०१२ आहे. त्यामुळे संचालनालय स्तरावरुन वेळोवेळी देण्यात येण्याऱ्या सूचनाची अमंलबजावनी वेळेत होईल, याकडे विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांनी लक्ष दयावे. एका शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज शक्यतो एकदाच एकत्रित करावेत.

१२.) विभागीय शिक्षणउपसंचालकांनी सदर योजनेचा आढावा प्रत्येक आठवडयात घ्यावा. तसेच सदर योजनेच्या कामाकाजाच्या दुष्टीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांना आपल्या स्तरावरुन योग्य त्या सुचना द्याव्यात. त्यांच्या समन्वयाबद्दल कोणत्याही प्रकाराची तक्रार संचालनालयाकडे येणार नाही. याची दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घ्यावी.

१३.) या योजनेची अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत केंद्र शासनाने ३१ ऑगस्ट २०१२ ही दिली असली तरी महाराष्ट्रात येणाऱ्या अर्जाची संख्या विचारात घेता आणि केंद्र शासनास प्रस्ताव वेळेत सादर करण्याची अट लक्षात घेता विद्यार्थ्याकडून अर्ज लवकरात लवकर प्राप्त करुन घेऊन आलेले अर्ज वर दिलेल्या सूचनानूसार एकत्र करुन पुढील वेळापत्रकाप्रमाणे सादर करावेत. ३१ ऑगष्ट नंतर विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार नाहीत यांची कल्पना घ्यावी.

१४.) नूतनीकरणाची माहितीही ऑनलाईनपध्दतीने भरावयाची असल्याने ती विहित वेळेत ऑनलाईन पध्दतीने भरावी.

**( सुनिल मगर )**
शिक्षण सहसंचालक
(अंदाज,प्रशासन व नियोजन)
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१.

प्रत,

मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१) आयुक्त, महानगरपालिका
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व